# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001

**E-mail** desk5.dte@gmail.com **Web** www.dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ कालमर्यादित

क्रमांक : 5(3)/आस्था/पफेआ/2017/365

दिनांक : 06.07.2017

प्रति,

सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये.
सर्व प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने, व तत्सम संस्था.

विषय : सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक सुचना......
संदर्भ : शासन परिपत्रक, क्रमांक-पदनि0617/प्र.क्र.20/ आपुक दि 29.06.2017.

उपरोक्त विषयासंदर्भाचे शासन परिपत्रक कृपया पहावे.

सर्व शासकीय पदवी / पदविका संस्थेच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भीय शासन परिपत्रक शासनाच्या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावा आणि सदर शासन परिपत्रकाचे काटेकोर पणे अवलोकन करावे. सदर परिपत्रकाचे अवलोकन केले असता सदर माहिती शासनास अत्यल्प कालावधीत सादर करावयाची आहे असे दिसून येते.

शासनाच्या सदर परिपत्रकाचे अवलोकन केले असता सदरची कार्यवाही अत्यल्प कालावधीत पूर्ण करावयाची असल्याने ती विहित कालावधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने संचालनालयाने एक कालावधी ठरविला असून सदर कालावधीत सर्व संस्थांनी आपली माहिती अचूक तयार करुन संचालनालयात जबाबदार अधिकारी तसेच ते उपलब्ध नसल्यास कर्मचारी यांनी घेऊन उपस्थित रहावे. तसेच सदरची माहितीची SOFT COPY सुध्दा सोबत आणावी. सदर परिपत्रकातील माहिती देताना काही अडचणी असल्यास त्या वेळीच दुरध्वनीवरुन स्पष्ट करुन घ्याव्यात म्हणजे माहिती अचूक तयार करणे संस्थेस शक्य होईल. सदरची माहिती शासनास विहित वेळेत सादर करावयचा असल्याने संस्थेस सुचित करण्यात येते की आवश्यक असल्यास सुटीच्या दिवशी येऊन सदरचे काम पूर्ण करावे.

माहिती पाठविताना खालील बाबी जास्त लक्षपुर्वक पडताळून सादर करण्यात याव्यात. तसेच माहिती अचूक असेच याची दक्षता घ्यावी.

1. संस्थेची मंजूर पदे तसेच पदनाम सेवार्थ प्रणालीमध्ये अचूक भरली आहेत काय हे पडताळून घ्यावे. तसेच दि 26.11.2009 रोजी संस्थेतील पदे स्थायी करण्यात आली आहेत. सदर स्थायी पदे तसेच अस्थायी पदे वेळोवेळी पुढे चालू ठेवण्याबाबत शासन आदेश निर्गमीत होतात सदर शासन आदेशातील पदे सेवार्थ प्रणालीमध्ये अचूक असल्याबाबत खातरजमा करुन स्थायी अस्थायी पदांची योग्य माहिती सादर करण्यात यावी.

2. शासन परिपत्रकातील जोडपत्र क -1 नुसार आपल्या संस्थेची माहिती अचूक सादर करण्यात यावी. (सोबत excel sheet  जोडली आहे त्यात नमुद केलेल्या पदानुसार संस्थेची माहिती भरावी) संचालनालयाने दिलेला पदांचा क्रम कोणत्याही कारणासाठी बदलू नये.  त्यापेक्षा वेगळी पदे आपल्या संस्थेस मंजूर असतील तर दिलेल्या पदाच्या शेवटी नमूद करण्यात यावीत.

3. विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सोईसुविधा उदा. बस/रेल्वे पास सवलत, दिर्घ सुटी कालावधीत देण्यात येणा-या प्रवास सवलत, शिष्यवृत्ती संबंधित पत्रव्यवहार, विद्यार्थ्यांच्या संबंधित संकिर्ण टपाल ज्याची नोंद आवक जावक नोंद वहीत न करता विद्यार्थी विभागात अर्ज देऊन त्यावर तातडीची कार्यवाही करण्यात येते अशा टपालाचा समावेश करुन टपालाची वार्षिक आवक व जावक टपाल, प्रकरण नोंद वही व अन्य अभिलेखाची तपासणीकरुन कार्यभार किती  संख्या निश्चित करुन नमुद करण्यात यावी.

4. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने सन 2017-2018 या शैक्षणिक वर्षात त्यांच्या हँड बुक मध्ये पदव्युत्तर पदवी / पदवी / पदविका अभ्यासक्रमासाठी शिक्षकीय पदांची नविन मानके निश्चित केली आहेत.  सदर मानके विचारात घेऊन शिक्षकीय पदे नव्याने निश्चित केल्यामुळे परिणामी  प्रशासकीय (0.6)/ सहाय्यक तांत्रिक पदांमध्येही (0.9) बदल होण्याची शक्यता आहे.  तरी सदर बदल विचारात घेऊन प्रस्तावित पदांची माहिती नमुद करण्यात यावी.

5. जोडपत्र क  मध्ये सादरीकरणात अंतभुत केलेले मुद्दे व जोडपत्र क 1 नुसार पदांची  माहिती  अचूक अपेक्षित आहे.

6. सर्व संस्थानी मंजूर असलेली पदे सेवार्थ प्रणालीमध्ये अपलोड केलेली आहे याबाबचे संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र स्वतंत्ररित्या सादर करावे.
7. आपल्या संस्थेतील मंजूर पदांच्या वेतनश्रेणीमध्ये काही वेतनत्रृटी असल्यास त्याची माहिती ठोस कारण व आवश्यक ते कागदपत्रासह घेऊन यावे.
8. खाली दिलेल्या दिनांकास संस्थेतील अधिकारी / कर्मचारी उपस्थित न राहील्याने त्यांच्या संस्थेचा आढावा सादर करणे संचालनालयास शक्य होणार नाही अशा प्रकरणी झालेल्या कार्यवाहीस संस्था प्रमुख जबाबदार राहतील.
9. या पत्रासोबतची माहितीची प्रपत्रे ( excel sheets) संबंधित विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यात यावीत.

सदरची माहिती खाली नमुद केल्यानुसार संचालनालयात संस्थेने त्यांच्या माहितीसह उपस्थित रहायचे आहे.

| अक्र | विभागाचे नाव | संस्था | संचालनालयात उपस्थित राहण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | मुंबई / नाशिक | विभागातील सर्व शासकीय पदवी / पदविका संस्था | 11.07.2017 |
| 2. | अमरावती / नागपूर | विभागातील सर्व शासकीय पदवी / पदविका संस्था | 12.07.2017 |
| 3. | पुणे | विभागातील सर्व शासकीय पदवी / पदविका संस्था | 13.07.2017 |
| 4. | औरंगाबाद | विभागातील सर्व शासकीय पदवी / पदविका संस्था | 14.07.2017 |

सर्व पदवी / पदविका संस्थांना कळविण्यात येते की सदरचे परिपत्रक व त्यासोबतची जोडपत्रे संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घ्यावीत

sd/-
( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य , मुंबई

प्रति : सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना कळविण्यात येते की, वरील दिनांकास आपल्या विभागांतर्गत सर्व संस्था उपस्थित राहतील याची दक्षता आपल्यास्तरावरुन घेण्यात यावी. तसेच आपल्या कार्यालयातील जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे. आपल्या विभागांतर्गत शासकीय संस्था वेळापत्रकानुसार दिलेल्या दिवशी अनुपस्थित राहिल्यास त्याबाबची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय कार्यालयाची राहील याबाबत नोंद घ्यावी.

तसेच या पत्रा सोबतची माहितीची प्रपत्रे (excel sheets) विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावीत म्हणजे संस्थांना माहिती भरणे सुलभ होईल.

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.

2017-18



## Appendix 7

## Norms for Faculty requirements and Recommended Cadre Ratio for Technical Institution

### Diploma/ Post Diploma Programme

| | Faculty : Student based on Approved Intake* | Principal/ Director | Head of the Department | Lecturer | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | A | B | C | D = A+B+C |
| Engineering andTechnology/ Pharmacy/ Architecture/ Planning/ Applied Arts and Crafts, HMCT | 1:20 | 1 | 1per Department | (S/ 20) – (A+B) | S/20 |

* Of which, a minimum of 80 % should be Regular/ full time faculty and the remaining shall be Adjunct Faculty/ Resource persons from industry as per Annexure 10.

7.1 a S = Sum of number of students as per "Approved Intake" at all years

### Under Graduate Programme

| | Faculty : Student based on Approved Intake* | Principal/ Director | Professor | Associate Professor | Assistant Professor | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | | A | B | C | D | A+B+C+D |
| Engineering and Technology | 1:15 | 1 | $\frac{S}{15xR}-1$ | $\frac{S}{15xR}\times 2$ | $\frac{S}{15xR}\times 6$ | $\frac{S}{15}$ |
| Pharmacy | 1:15 | 1 | $\frac{S}{15xR}-1$ | $\frac{S}{15xR}\times 2$ | $\frac{S}{15xR}\times 6$ | $\frac{S}{15}$ |
| Architecture and Town Planning | | | | | | |
| a. Architecture | 1:16 | 1 | $\frac{S}{16xR}-1$ | $(\frac{S}{16xR}\times 2)$ | $(\frac{S}{16xR}\times 6)$ | $\frac{S}{16}$ |
| b. Town Planning | 1:16 | 1 | $\frac{S}{16xR}-1$ | $(\frac{S}{16xR}\times 2)$ | $(\frac{S}{16xR}\times 6)$ | $\frac{S}{16}$ |
| Applied Arts and Crafts | 1:10 | 1 | $\frac{S}{10xR}-1$ | $\frac{S}{10xR}\times 2$ | $\frac{S}{10xR}\times 6$ | $\frac{S}{10}$ |
| HMCT | 1:15 | 1 | $\frac{S}{15xR}-1$ | $\frac{S}{15xR}\times 2$ | $\frac{S}{15xR}\times 6$ | $\frac{S}{15}$ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

| |
|---|
| * Of which, a minimum of 80 % should be Regular/ full time faculty and the remaining shall be Adjunct Faculty/ Resource persons from industry as per Annexure 10. |
| S = Sum of number of students as per "Approved Intake" for all years, R = (1+2+6) |

## Post Graduate Programme

| | Faculty Student based on Approved Intake$ | Principal/ Director | Professor | Associate Professor | Assistant Professor | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | | A | B | C | D | A+B+C+D |
| *Engineering andTechnology | 1:12 | - | $\frac{S}{12xR}$ | $\frac{S}{12xR}$ | $\frac{S}{12xR}$ | $\frac{S}{12}$ |
| *Pharmacy | 1:10 | - | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10}$ |
| *Architecture and Town Planning | | | | | | |
| a. Architecture | 1:10 | - | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10}$ |
| b. Town Planning | 1:10 | - | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10}$ |
| *Applied Arts and Crafts | 1:10 | - | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10xR}$ | $\frac{S}{10}$ |
| *HMCT | 1:12 | - | $\frac{S}{12xR}$ | $\frac{S}{12xR}$ | $\frac{S}{12xR}$ | $\frac{S}{12}$ |
| #MBA/ PGDM | 1:15 | 1 | $\frac{S}{15xR}-1$ | $\frac{S}{15xR}\times 2$ | $\frac{S}{15xR}\times 6$ | $\frac{S}{15}$ |
| #MCA | 1:15 | 1 | $\frac{S}{15xR}-1$ | $\frac{S}{15xR}\times 2$ | $\frac{S}{15xR}\times 6$ | $\frac{S}{15}$ |

| |
|---|
| S = Sum of number of students as per "Approved Intake" for all years<br>*R = (1+1+1), #R = (1+2+6) |

$ Of which, a minimum of 80 % should be Regular/ full time faculty and the remaining shall be adjunct faculty/ resource persons from industry as per Annexure 10.

For every PG Programme, there should be at least one Professor with Ph.D. qualification

**Recommended Cadre Ratio shall be 1:2:6 or better.**